महाराष्ट्र शासन

क्र.प्रआयो-२०१८/प्र.क्र.१४१/योजना १०
ग्राम विकास व जलसंधारण विभाग,
बांधकाम भवन, २५, मर्झबान रोड,
फोर्ट, मुंबई-४०० ००१
दिनांक : ०८ मे, २०१८

प्रति,

संचालक,
राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण,
सिडको भवन, ५ वा मजला,
बेलापूर, नवी मुंबई.

विषय- पंडीत दीनदयाळ उपाध्याय घरकुल जागा खरेदी अर्थसहाय योजनेच्या
अनुषंगाने शासनाच्या अभिप्रायार्थ मुद्दा

संदर्भ :- आपले जा.क्र.१०६५/राव्यक/ग्रागृ/पंदीउ/२०१८, दि.१६.२.२०१८.

महोदय,

उपरोक्त विषयावरील आपल्या संदर्भाधीन पत्राच्या अनुषंगाने -

अ) आवश्यक भूखंडाचे क्षेत्रफळ या मुद्या बाबत नमूद करण्यात येते की, पंडीत दीनदयाळ उपाध्याय घरकुल जागा खरेदी अर्थसहाय योजनेच्या शासन निर्णयात शौचालयासह घरकुलाचे बांधकाम व चार बाजूने मोकळी जागा विचारात घेऊनच ५०० चौ.फूटापर्यंतचे क्षेत्रफळ निश्चित केले आहे. म्हणजेच जास्तीत जास्त ५०० चौ.फु. ही मर्यादा असुन योजनेच्या घरकुल बांधकामासाठी अनुज्ञेय किंवा लागणारे अपेक्षित क्षेत्र कमी असेल तरीही त्याला शासन निर्णयातील तरतुदीनुसार लाभ देता येईल. तथापि, ५०० चौ.फुट ही जास्तीत जास्त मर्यादा असल्यामुळे त्यापेक्षा जास्त क्षेत्रफळाचा भूखंड खरेदी करता येणार नाही. तसेच सदर घेण्याचा निर्णय हा मंत्रिमंडळाने घेतला असल्यामुळे त्यात बदल करावयाचा झाल्यास मंत्रिमंडळापुढे जावे लागेल. सुधारणा करण्याची मागणी संयुक्तीक नसल्यामुळे त्याबाबत विचार करण्याची आवश्यकता नाही.

ब) भूखंड खरेदीचे सर्वगनिहाय, जिल्हानिहाय, वर्षनिहाय उद्दिष्टाच्या मुद्याबाबत नमूद करण्यात येते की, पंडीत दीनदयाळ उपाध्याय घरकुल जागा खरेदी अर्थसहाय योजना ही प्रधानमंत्री आवास योजना (ग्रामीण) व अन्य ग्रामीण गृहनिर्माण योजनेतील घरकुल पात्र परंतु जागा नसलेल्या लाभार्थ्यांसाठी राबविण्यात येणारी पुरक योजना आहे. सदर योजनेसाठी उपलब्ध होणारा निधी हा अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती व सर्वसाधारण प्रवर्गानुसार उपलब्ध होतो त्यामुळे त्या आधारे प्रवर्गनिहाय निश्चित केलेल्या उद्दिष्टानुसारच तो खर्च करणे अपेक्षित आहे.

प्रस्तुत प्रकरणी पंडीत दीनदयाळ उपाध्याय घरकुल जागा खरेदी अर्थसहाय योजनेंतर्गत सन २०१६-१७ मध्ये प्रवर्गनिहाय १२००० उद्दिष्ट निश्चित करण्यात आले असून रु.६०.०० कोटी निधी उपलब्ध आहे. सन २०१७-१८ मध्ये योजनेकरीता उद्दिष्ट निश्चित करण्यात आलेले नाही. तथापि,

सन २०१६-१७ मध्ये प्रधानमंत्री आवास योजना (ग्रामीण) अंतर्गत देण्यात आलेल्या उद्दिष्टानुसार, जागा नसलेल्या लाभार्थ्यांच्या घरकुलांची पुर्तता पूर्ण झाल्यानंतर जर उद्दिष्ट शिल्लक राहत असले, तर ते सन २०१७-१८ मध्ये प्रवर्गनिहाय वापरण्यास परवानगी देण्यास हरकत नाही. संचालकांचा प्रस्ताव देखील अशाच स्वरूपाचा असल्यामुळे शासन निर्णयात अशा स्वरूपाची सुधारणा करण्याची आवश्यकता दिसुन येत नाही. सदरचा प्रश्न पत्रव्यवहार करून देखील सुटू शकतो.

तसेच योजनेचे उद्दिष्ट निश्चित करताना अधिक स्पष्टता आणावयाची असल्यास सर्व ग्रामीण घरकुल योजनेतील घरकुल पात्र लाभार्थी, जागा असलेले लाभार्थी, जागा नसलेले लाभार्थी यांची माहिती उपलब्ध करून त्या आधारे जिल्हानिहाय व प्रवर्गनिहाय उद्दिष्ट निश्चित केल्यास अशी बाब उद्भवणार नाही. तसेच संबंधित विभागाकडून निधीची मागणी करताना देखील सदर माहिती उपयोगात आणता येईल.

क) जागा खरेदीचे पुर या मुद्या बाबत नमूद करण्यात येते की, पंडीत दीनदयाळ उपाध्याय घरकुल जागा खरेदी अर्थसहाय्य योजना ही प्रधानमंत्री आवास योजना (ग्रामीण) व अन्य ग्रामीण घरकुल योजनेतील घरकुल पात्र परंतु जागा नसलेल्या लाभार्थ्यांना अर्थसहाय्य देण्यासाठी सुरु केली आहे. एखाद्या कुटुंबातील एखाद्या व्यक्तीचे नाव प्रतिक्षा यादी आल्यास व त्यास जागा उपलब्ध नसल्यास जर त्याने बाहेरून जागा खरेदी केली असती तर त्याला या योजनेचा लाभ दिला असता परंतु त्याने जर रक्ताच्या नात्यात जागा खरेदी केल्यास त्यास या योजनेच्या लाभापासून वंचित ठेवणे उचित होणार नाही. तसेच रक्ताच्या नात्यात जागा खरेदीचे अर्थसहाय्य देऊ नये यामागचे कारण समजुन येत नाही. अशा प्रकरणी केवळ स्वतंत्र कुटुंबे असल्याची खात्री करून असा लाभ देण्यास हरकत नसावी. त्यामुळे ही सुधारणा देखील मान्य करता येण्यासारखी नाही. पत्रव्यवहाराने प्रश्न सुटू शकतो

आपला,

(अ.मा.काळे)
अवर सचिव, ग्राम विकास विभाग